Volume-2 (2021)
Issue-2 (September-2021)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

# स्त्रियांचे उद्धारकर्ते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ. विश्वनाथ आत्माराम दरेकार**
सहा. प्राध्यापक (राज्यशास्त्र विभाग)
भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय
एटापल्ली जि. गडचिरोली
profvadarekar@gmail,com

**सारांश :–**

भारतीय समाज व्यवस्था प्राचीन काळापासून वर्णव्यवस्थेवर आधारित होती. देशात पितृसत्ताक पद्धती असल्याने कुटुंबावर पुरूषांची हुकूमत चालत असायची. त्यामुळे स्त्रिला स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. तिला ‘चूल आणि मूल’ या रूढी परंपरेत जीवन जगणे भाग पडत होते. स्वाभिमानाने जगणे नव्हते. ती सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातून कायमची दूरच होती. १९ व्या शतकात स्त्रियांच्या अधिकार व हक्कासाठी काही समाजसुधारकांनी प्रयत्न केले. परंतु भारतीय समाजव्यवस्थेमध्ये हिंदू रूढी, परंपरांना मोडणे त्या सुधारकांना शक्य झाले नाही. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या होणाऱ्या शोषणाला व विटंबनेला रोखण्याकरिता मनुस्मृतीसारख्या ग्रंथाचे दहन करून हिंदू कोड बिलात अनेक सुधारणा आणण्याचे कार्य केले. स्त्रियांना शिक्षित करणे, त्यांना जागृत करणे व माणुसकीचे जीवन प्रदान करणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय होते. ज्या हक्कापासून स्त्री वंचित होती ते सर्व अधिकार त्यांना मिळावे, शेकडो वर्षापासून होणारी स्त्रीची विटंबना थांबावी या उद्देशाने हिंदू कोड बिल संसदेत मांडण्यात आले. परंतु त्याला काही लोकांचा विरोध झाला.

भारतीय राज्यघटनेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री पुरूष समानतेचा अधिकार दिला. स्त्रियांना घटस्फोट व संपती वारसा अधिकार तसेच मतदान व राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात समान दर्जाची संधी मिळावी यासाठी मोलाचे योगदान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले. सर्व धर्मातील स्त्रीविषयक दृष्टीकोनाचा अभ्यास करून स्त्रियांना राजकीय क्षेत्रात ३३ टक्के अधिकराची तरतूद करण्यात आली. म्हणून आज तंत्रज्ञान, अवकाश, शिक्षण, अर्थकारण, समाजकारण अशा अनेक क्षेत्रात स्त्रियांनी आपले स्थान निर्माण केले.

**बीज शब्द :** वर्णव्यवस्थेवर आधारित महिलांची विटबंना, स्त्री–पुरू ष असमानता, हिंदू कोडबिल (हिंदू संहिता विधेयक), घटनात्मक अधिकार

**प्रस्तावना :–**

भारतीय समाज व्यवस्था प्राचीन काळापासून वर्णव्यवस्थेवर आधारित होती. ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य आणि शुद्र अशा प्रकारची उतरत्या क्रमांक आणि व्यवसायाच्या आधारावर समाजव्यवस्था अस्तित्वात होती. स्त्रियांना शिक्षणापासून व ज्ञानापासून वंचित ठेवले गेले होते. धर्माच्या नावाखाली स्त्रियांना अनेक रूढी, परंपरांना बळी पडावे लागत होते. स्त्रियांना चूल आणि मूल याव्यतिरिक्त कुठेच संधी नव्हती. बौद्ध धर्म वगळला तर इतर धर्मात स्त्रियांविषयीचा दृष्टीकोन अमानवी स्वरूपाचाच होता. एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्रियांच्या हक्क प्रश्नांना विशेष हात घालण्याचे धाडस कुणीच केले नाही. म्हणून स्त्री ही उपभोगाची वस्तू म्हणून तिच्याकडे बघितल्या जात होते व स्त्रिया मुकाटयाने अन्याय, अत्याचार व परंपरेला बळी पडून ते सहन करीत होत्या.

एकोणिसाव्या शतकापासून स्त्री जीवनाबद्दल व रूढी, परंपरांना मोडण्याकरिता अनेक समाजसुधारकांची फार मोठी फळी निर्माण झाली. राजा राममोहन रॉय, लोकहितवादी, आगरकर, बाळशास्त्री जांबेकर, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी समाजसुधारकांनी स्त्रियांच्या हक्क व अधिकारासाठी या रूढी, परंपरांना नष्ट करण्याचा सातत्याने प्रयत्न केलेला दिसून येतो.

स्त्रियांवरील अत्याचारासंदर्भात मनुस्मृतीने सांगितलेल्या शिक्षा वर्गागणिक ठरविलेल्या होत्या. या अमानवी विचारांना शह देण्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाची रचना केली. आंबेडकरांना स्त्रियांनी खूप शिकावे, दुर्गुणांपासून मूक्त व्हावे असे वाटायचे. डॉ. आंबेडकरांनी सर्व धर्मातील स्त्रीविषयक दृष्टीकोनाचा बारकाईने विचार करून हिंदू कोड बिल मांडले. त्यापूर्वी त्यांनी मनुस्मृतीचा अभ्यास केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ध्येय होते ज्या हक्कापासून स्त्री वंचित होती ते सर्व अधिकार त्यांना मिळावे, भारतातील समस्त स्त्रियांमध्ये परिवर्तन घडून यावे. शेकडो वर्षापासून होणारी स्त्रियांची विटंबना थांबवून त्यांच्यात स्वाभिमान व स्व–विश्वास जागृत व्हावा. प्राचीन काळापासून ज्या स्त्री वर्गाला बंदिस्त ठेवण्यात आले होते त्या स्त्रियांना अधिकाराची, कर्तव्याची सनद मिळवून दिली. डॉ. आंबेडकरांनी भारतातील जातीचा अभ्यास करताना जातीच्या निर्मितीत स्त्री जातीचा कसा बळी देण्यात आला. सतीप्रथा, विधवा पुनर्विवाहावर बंदी, बालविवाह या सगळया धार्मिक रूढी, परंपरांचा त्याग करून माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळवून दिला. डॉ. आंबेडकरांनी स्त्रीमुक्तीसाठी प्रत्येक सभेत अत्यंत प्रभावी व हृदयाला भिडणाऱ्या मर्मस्पर्शी भाषणातून व प्रत्यक्ष कृती आणि चळवळीतून स्त्रियांना रूढी परंपरेच्या बंधनातून मुक्त करून व त्यांच्या मनावर चढलेल्या जुन्या, बुरसट व अनिष्ट विचारांचा गंज काढण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी कार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या गाभाऱ्यात स्त्री–पुरूष समतेला स्थान दिले. इतकेच नाही तर त्यासाठी आंदोलनेसुद्धा केली. हिंदू कोड बिल तर हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. स्त्रीमुक्तीचा ध्यास डॉ. बाबासाहेबांनी घेतला होता. सन १९४७ पासून जवळपास तीन वर्षाच्या अथक परिश्रमातून तयार केलेल्या हिंदू कोड बिलात स्त्रियांना कायद्याने हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त व्हावी हे ध्येय होते. संसदेत १९५१ ला हिंदू कोड बिल फेटाळले गेले. तेव्हा अत्यंत दु:खी व निराश होऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला. केवढा प्रचंड त्याग त्यांनी तेव्हा स्त्रियांच्या हक्काकरिता केला.

**स्त्री कामगारांना प्रसुतीभत्ता :–**

खाण कामगार प्रसुती लाभ कायदा १९४१ मध्ये सुधारणा करण्यासाठी २९ जुलै १९४३ ला केंद्रीय विधीमंडळात प्रचलित बिल चर्चेला घेऊन त्यात बाळंतपणापूर्वीच्या चार आठवडयाच्या काळात स्त्रीला प्रसुतीभत्ता मिळण्याचा हक्क राहील अशी तरतूद केली. स्त्री म्हणून कामाच्या ठिकाणी होणारे तिचे शोषण, तिला मिळणारी दुय्यम वागणूक त्याचबरोबर प्रसुतीपूर्व काळात स्त्रियांना ठराविक विश्रांती व सोई मिळाल्या पाहिजे असे विचार मांडण्यात आले. स्त्री पुरुषांना समान मजुरी हे महान तत्त्व पहिल्यांदाच स्वीकारण्यात आले. महिलांना प्रसुती काळात रजा उपभोगतांना पूर्ण पगार मिळावा यासंबंधीचे विधेयक डॉ. आंबेडकरांनी २९ जुलै १९४३ रोजी केंद्रीय विधीमंडळात सादर केले.

**१९४२ ची नागपूर महिला परिषद** :–

या परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मागणी केली की, पती पत्नीला घटस्फोट असलेला कायदा सरकारने करावा आणि बहुपत्नीत्वाची प्रथा कायद्याने बंद करावी. मजूर व कामकरी स्त्रियांसाठी २१ दिवसाची किरकोळ रजा, एका महिन्याची हक्काची रजा व दुखापत झाल्यास नुकसान भरपाई तसेच २० वर्षाची नोकरी झाल्यावर किमान दरमहा १५ रूपये पेन्शन देण्याची योजना करावी असा ठराव मजूर मंत्र्यामार्फत व्हॉईसरॉयला पाठविण्यात आला.

**हिंदू कोडबिल (हिंदू संहिता विधेयक) :–**

हा भारतातील कायद्याचा मसुदा होता. हा मसुदा २८ फेब्रुवारी १९४९ मध्ये संसदेत मांडला गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री होते. भारतातील सर्व जाती धर्मातील स्त्रियांची जाचक रूढी आणि परंपरांपासून सुटका व्हावी यासाठी हा मसुदा बनविण्यात आला. ३ वर्षे १ महिना २६ दिवस यावर काम करून हे हिंदू कोड बिल तयार केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना काही विशेष वर्ग किंवा विशेष जातीच्या स्त्रियांना त्याचा फायदा होईल याची चिंता नव्हती. त्यांना सर्व जाती आणि धर्माच्या स्त्रियांच्या अधिकारांचे संरक्षण करायचे होते. स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. आंबेडकर यांनी १९४८ मध्ये संविधान सभेत ‘हिंदू कोड बिल’चा मसुदा प्रस्तुत केला. यात घटस्फोट देण्याचा अधिकार, विधवा आणि मुलींना संपतीमध्ये अधिकार असावा अशा तरतूदी करून या बिलामध्ये आठ अधिनियम बनवले होते.

१. हिंदू विवाह अधिनियम
२. २. विशे  ा विवाह अधिनियम
३. दत्तक घेणे, दत्तकग्रहण, अल्पायु–संरक्षता अधिनियम
४. हिंदू वारसदार अधिनियम
५. दुर्बल आणि साधनहिन कुटुंबातील सदस्य यांना भरण पो  ाण अधिनियम
६. अप्राप्तवय संरक्षणसंबंधी अधिनियम
७. वारसदार अधिनियम
८. हिंदू विधवाला पुनर्विवाह अधिकार अधिनियम

हे बिल अनेक कुप्रथांना हिंदू धर्मापासून दूर करत होते. या बिलाला जोरदार विरोध झाला. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.

एखाद्या समाजाची प्रगती मोजायची असेल तर त्या समाजातील महिलांची प्रगती किती झाली आहे हे मी मोजत असतो, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरमध्ये आयोजित ‘ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वीमेन्स कॉन्फरन्स’मध्ये म्हटले होते. हिंदू कोडबिलाबाबत कायदामंत्री म्हणून आपली भूमिका मांडताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, ‘समाजाच्या विविध वर्गात असलेली असमानता, स्त्री पुरुषांमधील असमानता कायम ठेवून आर्थिक समस्यांशी निगडीत कायदे मंजूर करत जाणे म्हणजे आपल्या संविधानाची चेष्टा करण्यासारखे आहे, शेणाच्या ढिगाऱ्यावर राजप्रसाद बांधण्यासारखे होय. हिंदू संहितेला मी हे महत्त्व देतो.

शतकानुशतके मनुस्मृतीच्या नावाने केवळ दलितांवरच नाही तर महिलांवरही अत्याचार केले गेले. हीच मनुस्मृती दलित आणि महिलांच्या ऱ्हासाचे कारण असल्याचे बाबासाहेब कायम सांगत. महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी शिकले पाहिजे हा संदेश महात्मा फुले यांनी दिला तर स्त्रियांना त्यांचे हक्क

कायद्याने मिळवून देण्याचे सगळयात मोठे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. या महापुरुषाच्या याच कार्यामुळे आज महिला समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कर्तव्य बजावत आहेत. शेतीपासून ते देशाच्या संरक्षणापर्यंत, ग्रामपंचायतीपासून ते देशाच्या संसदेपर्यंत महिला सर्वत्र दिसत आहेत, हे शक्य झाले ते या महामानवाच्या कार्यामुळे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात महिलांना मतदानाचा अधिकार नव्हता. स्त्रियांना मतदानाचा अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवून दिला. हिंदू कोड बिलाद्वारे स्त्रीला एक माणूस म्हणून जगण्याचा अधिकार मिळाला.

भारतातील समाजव्यवस्थेत धर्माची आज्ञा प्रमाण मानून 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' अशा कुविचाराचे बीज सर्वत्र पेरलेले असल्यामुळेच मनुने घालून दिलेल्या नियमानुसार समस्त वर्गातील स्त्रियांना त्यांच्या मानवी हक्कापासून वंचित करून त्यांच्या जीवाचा कोंडमारा केला. मन संस्कारीत होणाऱ्या शिक्षणापासून त्यांना वंचित ठेवून त्या ज्ञानाचा त्यांना अधिकार न देता शारीरिक व मानसिक छळ करण्यात आले आणि स्त्री केवळ उपभोग्य वस्तू म्हणून या पुरूषप्रधान संस्कृतीत तिचं शोषण होऊन अनेक प्रकारचे दु:ख तिच्या वाट्याला आणले. असे समस्त वर्गातील स्त्रियांच्या दु:खाचं चित्र आपल्यासमोर असले तरी स्त्रियांच्या जीवनाची शोकांतिका भयंकर आहे. बदलत्या काळानुसार आणि कायद्यानुसार समस्त वर्गातील स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टी बदलत असल्यामुळे जरी त्यांच्या दु:खाचे प्रमाण व त्या अनुषंगाने त्यांच्या प्रश्नाचे प्रमाण कमी झाले; त्या पूर्वीपेक्षा अधिक मुक्त झाल्या असं वाटत असलं तरीसुद्धा स्त्रियांचे दु:ख आणि त्यांचे होणारे मानसिक व शारीरिक शोषण आणि त्यातून निर्माण होणारे प्रश्न आजही स्वातंत्र्याचा अर्थ लावताना अंतर्मुख करतात.

समाजातील स्त्रीला तिच्या कुटुंबात दुय्यम दर्जा आहे. पतीची सेवा करणे आणि पातिव्रत्य पाळणे हा तिचा स्त्रीधर्म समजला जातो. परंपरागत समाजात कुटुंबातील स्त्री–पुरुषांच्या श्रमविभागणीमुळे पुरुष हा घराचा मालक मानला जातो. अजूनही 'मालक घरी नाही' असंच स्त्रियांकडून बाहेरच्याला उत्तर दिलं जातं. त्यामुळे पितृसत्ताक पद्धत निर्माण होऊन स्त्रीचं अस्तित्व नगण्य असतं. अडाणी, अशिक्षित तसेच ग्रामीण कुटुंबात कुटुंब नियोजनही नसतें. अशावेळी जोपर्यंत मुलगा होत नाही तोपर्यंत तिने गर्भधारणा केलीच पाहिजे ही त्या कुटुंबात ठरलेली बाब असते. त्यामुळे तिच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. स्त्री शिकलेली असली तरी ती नोकरी करून अर्थाजनासाठी बाहेर पाठविल्या जात नाही. "बायकोच्या कमाईवर जगू का? एवढा मी काही अजून लुळा–पांगळा नाही." अशा खोट्या प्रतिष्ठेच्या आहारी गेलेला नवरा आणि त्याचा वृथा अभिमान यानेसुद्धा स्त्रियांसमोर आर्थिक दुर्बलतेचा प्रश्न निर्माण होतो.

स्वातंत्र्यपूर्व काळात इतर वर्णातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जापेक्षा दलित स्त्रियांचा दर्जा वरचा होता. समाजात सामाजिक बंधने फारशी लादली नव्हती. त्या काळातही पुनर्विवाहास परवानगी होती. नवऱ्याकडून काडीमोड घेण्याचा अधिकार होता. हुंड्याचा प्रश्नच नसल्यामुळे हुंडाबळी जात नसत. मात्र शिक्षणाचा अभाव व अज्ञानामुळे प्रश्न निर्माण झाले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुलेंच्या आधी कोणत्याच सुधारकाने, स्त्री सुधारकाने स्त्री सुधारणेसाठी शिक्षणाचा विचार केला नाही. त्यामुळे ती हिंदू धर्मातील जाचक रूढी व अंधश्रद्धा यात गुरफटून तिनं स्वत:भोवती अनेक प्रश्न निर्माण केले होते. तेव्हा स्त्री स्वातंत्र्याचे कैवारी असणाऱ्या बाबासाहेबांनी १९२७ ला मनुस्मृतीचे दहन करून महाड सत्याग्रहाच्या वेळी तिच्यातल्या क्षमतेला आवाहन करून तिच्यात आत्मभान निर्माण केले आणि 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' हा संदेश देऊन तिच्या विकासास पोषक असा बुद्धिप्रामाण्यवादी बौद्धधम्माचा मार्ग दाखविला. घटनेच्या १५ व्या कलमानुसार स्त्री–पुरुष समतेचा अधिकार देऊन हिंदू कोड बिलाच्या रूपाने समस्त वर्गातील स्त्रियांप्रमाणेच

तिच्यासाठीसुद्धा स्वांतंत्र्याचा जाहीरनामा तयार केला. तथापि अजूनही दलित समाजात मनूचे काही वारस शिल्लक असल्यामुळे स्वातंत्र्योत्तर ७५ वर्षाच्या कालखंडातसुद्धा स्त्रीला तिच्या समाजाअंतर्गत काही प्रश्नांना सामोरे जावे लागते.

**निष्कर्ष :—**

आजही बहुसंख्य समाज दारिद्र्य रेषेखालचे जीवन जगत आहे. दारिद्र्यामुळे अज्ञान व अज्ञानामुळे दारिद्र्य या चक्रात बहुजन समाजातील स्त्री गुरफटून गेली आहे. दारिद्र्य तसेच शिक्षणाचा अभाव या कारणामुळे स्त्रीया या बहुतांशी श्रमिक, कष्टकरी वर्गात मोडतात. ग्रामीण भागात सवर्णांच्या शेतावर कामास जातात. शहरात मोलमजुरी करतात. घरकाम करतात. अशावेळी तिच्यापुढे असुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. बरेचदा तिला इतर पुरुषांच्या, मालकांच्या, गावगुंडांच्या वासनेची शिकार व्हावे लागते. तर कधी चारित्रहननाचे प्रश्न निर्माण होतात. अशाप्रकारे येथील जातीव्यवस्थेने पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने आणि दारिद्र्य, अज्ञान व त्यातून आलेल्या आर्थिक दुर्बलतेतून स्त्रियांच्या जीवनात अनेक प्रश्न उपस्थित केलेत. एक स्त्री म्हणून दुहेरी पातळीवर शोषणाचा सामना करावा लागतो. काही स्त्रियांबाबत त्यांच्यातील शिक्षणामुळे, कायद्यामुळे आणि जनमाणसाचा त्यांच्याकडे बघण्याच्या दृष्टीकोनामुळे फरक झाला. त्यातील तीव्रता कमी झाली असली तरी स्त्रीयांचे प्रश्न मात्र संपले नाहीत.

ग्रामीण भागातील दलित स्त्रियांचे प्रश्न हे अशा स्वरूपाचे तर शहरातील शिक्षित नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न पाहिले तर त्या प्रश्नांचे नवेच स्वरूप आपल्या लक्षात येते. खरं तर डॉ. बाबासाहेबांच्या शिक्षणविषयक विचारातून प्रेरणा घेऊन दलित स्त्रियांनी आपले दलितत्व झुगारून दिले आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात त्या कार्यरत आहेत. काही शासकीय सेवेत दिसून येतात. अर्थात बदलत्या कायद्यानुसार, काळानुसार समस्त स्त्री प्रश्नाकडे बघण्याची दृष्टी बदलली तरी त्यांचे प्रश्न संपले नाहीत.

ग्रामीण भागातले राजकारण तर आणखी वेगळेच. राजकारणात राखीव जागेवर निवडून आलेल्या स्त्रिया पुरुषांना सहन होत नाहीत. त्यातही जर ती दलित असली तर मग विचारायलाच नको. तिलाच नाही तर एकूण तिच्या कुटुंबाला आणि त्या गावातील लोकांनाच कसं वेठीस आणता येईल आणि त्यांची नाकेबंदी कशी करता येईल की ती राजकारणात शिरणार नाही असे प्रयत्न केले जातात.

**संदर्भ ग्रंथ :—**

१. दिक्षा विशेषांक २०११
२. लोकराज्य २०१६
३. मु. ल. जाधव, प्रा सुशीला, भगवान बंद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, कौशल्य प्रकाशन, हडको, औरंगाबाद
४. पाटील डॉ. माणीकताई , स्त्री काल, आज आणि उद्या, यशोदा प्रकाशन, बजाज नगर, अमरावती
५. wikipedia